02 SEP 2021

लोकमत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# सरसकट खासगीकरण आर्थिक सुधारणांना मारक : योगेंद्र अलघ

लोकमत न्यूज नेटवर्क

कोल्हापूर : सर्वच सुविधांचे सरसकट खासगीकरण करणे हे आर्थिक सुधारणांना मारक आहे. व्यावसायिक अर्थतज्ज्ञ आर्थिक सुधारणांच्या प्रक्रियेला पाठिंबा दर्शवितात; कारण त्या हळू होत असल्या, तरी खात्रीशीररीत्या होतातच. मात्र, त्यासाठी आजच्या पिढीने त्यागाची तयारी ठेवायला हवी, असे प्रतिपादन ज्येष्ठ अर्थतज्ज्ञ डॉ. योगेंद्र अलघ यांनी मंगळवारी केले.



डॉ. योगेंद्र अलघ

शिवाजी विद्यापीठाच्या अर्थशास्त्र अधिविभागातर्फे आयोजित ऑनलाईन व्याख्यानमालेतील तिसरे पुष्प त्यांनी गुंफले. 'भारतातील निवडक अर्थविषयक समस्या आणि त्यामागे कार्यरत सिद्धान्त' असा त्यांच्या व्याख्यानाचा विषय होता. अध्यक्षस्थानी कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के होते.

## तर...काबूलमधील भारतीय कसे आले असते ?

खासगीकरणाचा निर्णय विचारपूर्वक घेणे आवश्यक आहे. एअर इंडियाची विमानसेवा नसती, तर काबूलमधून भारतीय नागरिकांना एअरलिफ्ट करण्याचा धोका कोणत्या खासगी कंपनीने पत्करला असता? त्यामुळे परिपक्व देश खासगीकरणाच्या बाबतीतील निर्णय अत्यंत शहाणपणाने घेतात. याचा अर्थ सुधारणा करू नयेत, असा मात्र नसल्याचे डॉ. अलघ यांनी सांगितले.

दारिद्र्य निर्मूलन हा देशाच्या केवळ निवडणुकीचा नव्हे, तर सर्वसाधारण सर्वंकष धोरणाचा अविभाज्य घटक असायला हवा. देशाच्या विकासामध्ये अनुसूचित जातिजमातींमधील घटकांनाही बरोबरचे स्थान प्राप्त व्हावे. त्याचप्रमाणे त्यांच्या लोकसंख्येमध्ये अर्धा हिस्सा असणाऱ्या महिलांनाही त्या विकासाच्या प्रक्रियेमध्ये सामावून घेण्याचे प्रयत्न व्हायला हवेत. आदिवासी, दलित महिलांनाही या विकासात त्यांचा वाटा उचलण्याची संधी मिळायला हवी, असे डॉ. अलघ यांनी सांगितले. यावेळी विद्यापीठाचे प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील, ज्येष्ठ अर्थतज्ज्ञ डॉ. यशवंतराव थोरात प्रमुख उपस्थित होते. अर्थशास्त्र विभागप्रमुख डॉ. ज्ञानदेव तळुले यांनी प्रास्ताविक केले.

लोकमत

# शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

Estd : 1962
NAAC "A++" Grade

## दूरशिक्षण केंद्र

### शैक्षणिक वर्ष २०२१-२२ साठी प्रवेश सूचना

- एम.ए. (मराठी, हिंदी, इंग्रजी, अर्थशास्त्र, इतिहास, राज्यशास्त्र, समाजशास्त्र), एम. कॉम., एम.एस्सी. (गणित), एम.बी.ए., बी.ए., बी.कॉम., आदी विद्यापीठ अनुदान आयोग नवी दिल्ली मान्यताप्राप्त अभ्यासक्रमांना प्रवेश.
- एम.बी.ए. (ए.आय.सी.टी. ई. मान्यताप्राप्त)
- पी.जी. डिप्लोमा इन ट्रान्सलेशन
- विद्यार्थी, गृहिणी, नोकरदार, शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी, सैनिक, उद्योजक, शेतकरी, कामगार, बंदीजन यांना पदव्युत्तर अभ्यासक्रमासाठी मिळणार प्रवेश.
- कोल्हापूर, सांगली, सातारा जिल्ह्यातील दुर्गम भागासह ८१ अभ्यासकेंद्र
- अभ्यासकेंद्रांमध्ये संपर्क सत्रांचे आयोजन.
- विषयतज्ञ प्राध्यापकांचे गुणवत्तापूर्ण मार्गदर्शन.
- दर्जेदार स्वयं अध्ययन साहित्य उपलब्ध.
- विद्यार्थ्यांना नेट-सेट, स्पर्धा परीक्षा तसेच मुलाखत तंत्राबाबत उद्बोधन.
- विद्यार्थ्यांना Online माध्यमातून १५०० पेक्षा जास्त Video Lectures द्वारे मार्गदर्शन.
- Video conferencing द्वारे संवाद वर्ग व online learning methodology चा उपयोग
- Digital-online course material.
- **M.Sc. (Mathematics), M.Sc. (Computer Science) आणि M. Com. हे अभ्यासक्रम ऑनलाईन पद्धतीने शिकण्याची सुवर्णसंधी.**
- ऑनलाईन पद्धतीने अभ्यासपूरक अशा शिकण्यासाठीच्या सुविधा उपलब्ध.
- विद्यार्थ्यांच्या वैचारिक, व्यावहारिक, रोजगाराभिमुख कौशल्याच्या विकासावर भर.
- विद्यार्थ्यांच्या सर्वांगिण विकासास अनुसरून अभ्यासक्रमाचे विकसन.
- ऑनलाईन पद्धतीने परीक्षा पद्धती

**प्रवेशासाठी विद्यार्थ्यांनी Pre-Registration Admission Form**

***https://docs.google.com/forms/d/e/1FAIpQLScYfckYSZWBrjFKS3StZKI6ETEerHhnsasSvn3efBo3wr76rA/viewform?usp=sf_link***

या लिंकचा किंवा वरील QR Code चा वापर करून आपली माहिती भरावी. सविस्तर जाहिरात व इतर अनुषंगिक माहिती लवकरच प्रसिद्ध करण्यात येईल.

**अधिक माहितीसाठी :** www.unishivaji.ac.in या संकेतस्थळावर Distance Education या लिंकवर भेट द्या अथवा ०२३१-२६०९४५१, २६०९४५२ या दूरध्वनीवर संपर्क साधावा.

जा.क्र. दूरशिक्षण/४४८
दिनांक :

**प्रा. डॉ. व्ही. डी. नांदवडेकर**
कुलसचिव

लोकसत्ता

# ना. वा. देशपांडे यांच्या ग्रंथसंपदेचे दान

**कोल्हापूर :** ज्येष्ठ दिवंगत कवी ना.वा. तथा नारायण वामन देशपांडे यांची समग्र ग्रंथसंपदा बुधवारी शिवाजी विद्यापीठाच्या बॅ. बाळासाहेब खर्डेकर केंद्राकडे सुपुर्द केली. देशपांडे यांनी कविता, गीतांसोबतच अनेक नामवंत शाहिरांसाठी लेखन केले. अनेक शाहिरांचे ते लाडके कवी होते. त्यांच्या अनेक रचना संगीतकार दिनकरराव पोवार यांनी संगीतबद्ध केल्या आहेत. राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांच्या विचारकार्याचा त्यांच्यावर मोठा प्रभाव होता. त्यांचे दोन वर्षांपूर्वी निधन झाले. त्यांच्याकडे महाभारत, भगवद्गीता, त्यांवरील भाष्ये, संतसाहित्य यांसह अनेकविध प्रकारची दुर्मिळ ग्रंथसंपदा होती. ग्रंथसंपदा चांगल्या ठिकाणी जावी आणि भावी पिढ्यांच्या उपयोगी पडावी, अशी त्यांची इच्छा होती. त्यांच्या माघारी पत्नी सुनंदा यांनी त्यांच्या ग्रंथसंपदेचा जिव्हाळ्याने सांभाळ केला होता. आज ४५६ ग्रंथ उपग्रंथपाल डॉ. डी. बी. सुतार यांच्याकडे सुपूर्द केले. प्रा. शशिकांत चौधरी यांचे या प्रक्रियेसाठी सहकार्य लाभले.

02 SEP 2021

पुण्यनगरी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# 'डी. वाय.' विद्यापीठ जागतिक स्तरावर ख्याती मिळवेल

## जिल्हाधिकारी रेखावार : विद्यापीठाचा १६ वा वर्धापनदिन | डॉ. जे. एफ. पाटील यांना जीवन गौरव पुरस्कार



कोल्हापूर : डी. वाय. पाटील अभिमत विद्यापीठाच्या १६ व्या वर्धापनदिनानिमित्त हॉटेल सयाजी येथील कार्यक्रमात डॉ. जे. एफ. पाटील यांना जीवन गौरव पुरस्कार देताना जिल्हाधिकारी राहुल रेखावार. सोबत डी. वाय. पाटील ग्रुपचे अध्यक्ष व कुलपती डॉ. संजय डी. पाटील. सोबत डॉ. शिम्पा शर्मा, विश्वस्त पृथ्वीराज पाटील, कुलगुरु डॉ. राकेश कुमार मुदगल, डॉ. व्ही. व्ही. भोसले आदी.

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

डी. वाय. पाटील विद्यापीठाने शिक्षण क्षेत्रात स्वतंत्र ओळख निर्माण केली आहे. येथील विद्यार्थी आंतरराष्ट्रीय स्तरावरही चांगली कामगिरी करत आहेत. नालंदा व तक्षशिलासारख्या महान विद्यापीठप्रमाणे डी. वाय. पाटील विद्यापीठाचे नावही मूल्य शिक्षणासाठी जागतिक स्तरावर अग्रगण्य राहील, असा विश्वास जिल्हाधिकारी राहुल रेखावार यांनी व्यक्त केला.

डी. वाय. पाटील अभिमत विद्यापीठाच्या १६ व्या वर्धापनदिनानिमित्त हॉटेल सयाजी येथील कार्यक्रमात गुणवंत कर्मचाऱ्यांचा सत्कार करण्यात आला. डॉ. जे. एफ. पाटील यांना जीवनगौरव पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले. प्रमुख पाहुणे म्हणून जिल्हाधिकारी रेखावार बोलत होते. अध्यक्षस्थानी डी. वाय. पाटील ग्रुपचे अध्यक्ष व कुलपती डॉ. संजय डी. पाटील होते.

रेखावार म्हणाले, डी. वाय पाटील अभिमत विद्यापीठाची वाटचाल ही आश्वासक आणि प्रेरणादायी आहे. डॉ. डी. वाय. पाटील यांनी लावलेल्या छोट्या रोपट्याचे त्यांचे पुत्र कुलपती डॉ. संजय डी. पाटील यांनी वटवृक्षात केलेले रूपांतर पाहून प्रचंड अभिमान वाटतो.

**अत्याधुनिक सुविधा देणार**

डॉ. डी. वाय. पाटील यांच्या दूरदृष्टी व मार्गदर्शनाखाली १९८९ मध्ये मेडिकल कॉलेज सुरू केले. अल्पावधीत कॉलजचे रुपांतर डी. वाय. पाटील युनिव्हर्सिटीमध्ये झाले. शिक्षणातील गरज ओळखून मेडिकलच्या विद्यार्थ्यांना एकाच छत्राखाली सर्व अत्याधुनिक सेवा-सुविधा देण्याचे नियोजन आहे. त्यासाठी लवकरच बहुमजली इमारत उभारण्याचा मानस कुलपती डॉ. संजय डी. पाटील यांनी व्यक्त केला. आतापर्यंत मेडिकल डीम्ड युनिव्हर्सिटीतून ३१०० विद्यार्थी शिक्षण घेऊन बाहेर पडले. ते देशभर आरोग्य सेवा देत आहेत. दर्जेदार संशोधनासाठी ऑस्ट्रेलिया, चीन, इंग्लंड, अमेरिका या परदेशातील विद्यापीठासह फुले पुणे विद्यापीठ, शिवाजी विद्यापीठ अशा अनेक विद्यापीठांबरोबर सामंजस्य करार केला असल्याचे त्यांनी सांगितले.

डॉ. जे. एफ. पाटील म्हणाले, डॉ. डी. वाय. पाटील विद्यापीठाच्या नावाने पुरस्कार मिळाल्याने मनापासून आनंद झाला. विद्यापीठाच्या १६ वर्षांचा प्रवास उलगडून दाखवणारी चित्रफीत कार्यक्रमात दाखवण्यात आली. अर्थतज्ज्ञ प्रा. डॉ. जे. एफ. पाटील यांच्या अर्थाभिव्यक्ती व एस्से इन इकॉनॉमिक्स पर्शियन या पुस्तकांचे प्रकाशन जिल्हाधिकारी रेखावार व डॉ. संजय पाटील यांच्या हस्ते झाले.

प्र-कुलगुरू डॉ. शिल्पा शर्मा यांनी प्रास्ताविक केले. आ. जयंत आसगावकर, विश्वस्त पृथ्वीराज पाटील, कुलसचिव डॉ. व्ही. व्ही. भोसले, अधिष्ठाता डॉ. राकेश कुमार शर्मा, सर्व प्राचार्य आदी उपस्थित होते. मेघराज काकडे, कार्यकारी संचालक डॉ. ए. के. गुप्ता, कुलगुरू डॉ. के. प्रथापन, अशोकराव देसाई, ॲड. रवी शिराळकर आदी उपस्थित होते.

02 SEP 2021

तरुण भारत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# विद्यार्थ्यांना अत्याधुनिक सुविधा देणार

## कुलपती डॉ. संजय डी. पाटील यांचे प्रतिपादन : डॉ. डी. वाय.पाटील विद्यापीठाचा वर्धापन दिन विविध उपक्रमांनी

प्रतिनिधी
कोल्हापूर

डॉ. डी. वाय. पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली १९८९मध्ये सुरू झालेल्या मेडीकल कॉलेजने केवळ १६ वर्षात अभिमत विद्यापीठाचा दर्जा संपादन केला. विद्यार्थ्यांना शिक्षणाबरोबर संशोधनाचीही संधी उपलब्ध करुन दिली. शिक्षणातील गरज ओळखून मेडिकलच्या विद्यार्थ्यांना एकाच छताखाली सर्व अत्याधुनिक सेवा-सुविधा देण्याचे नियोजन आहे. त्यासाठी लवकरच २१ मजली इमारत उभारण्याचा मानस डॉ. डी. वाय. पाटील विद्यापीठाचे कुलपती डॉ. संजय डी. पाटील यांनी व्यक्त केला. ते डॉ. डी. वाय. पाटील विद्यापीठाच्या १६ व्या वर्धापन दिनानिमित्त आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते. प्रमुख पाहुणे जिल्हाधिकारी राहूल रेखावार यांच्या हस्ते ज्येष्ठ अर्थतज्ज्ञ डॉ. जे. एफ. पाटील यांना जीवन गौरव पुरस्कार देवून गौरवण्यात आले. डॉ. जे. एफ. पाटील यांच्या पुस्तकाचे प्रकाशन करण्यात आले.



**कोल्हापूर : वर्धापन दिनी ज्येष्ठ अर्थतज्ज्ञ डॉ. जे. एफ. पाटील यांना जीवन गौरव पुरस्कारांने सन्मानित करताना जिल्हाधिकारी राहूल रेखावार, कुलपती डॉ. संजय डी. पाटील. सोबत प्र-कुलगुरु डॉ. शिंपा शर्मा, विश्वस्त पृथ्वीराज पाटील, कुलगुरू डॉ. राजेशकुमार मुदगल, अधिष्ठाता डॉ. राजेशकुमार शर्मा आदी.**

कुलपती डॉ. पाटील पुढे म्हणाले, मेडीकल कॉलेजच्या माध्यमातून, स्थानिक विद्यार्थ्यांना कमी खर्चात मेडिकलचे शिक्षण घेता आले. कॉलेजच्या स्थानिक ५० विद्यार्थ्यांनी आधुनिक हॉस्पिटल उभारली आहेत. ५०० बेडची क्षमता असलेल्या डी. वाय. पाटील हॉस्पिटलच्या माध्यमातून रूग्णांना जास्तीत जास्त सुविधा पुरवल्या जात आहेत. कोरोना कालावधीत ४५० कर्मचाऱ्यांनी रूग्णांना दर्जेदार सेवा दिल्यामुळे शासनाकडून गौरव, करण्यात आला आहे. आतापर्यंत मेडीकल अभिमत विद्यापीठातून ३१०० विद्यार्थी शिक्षण घेवून बाहेर पडले आहे. दर्जेदार संशोधनासाठी ऑस्ट्रेलिया, चीन, इंग्लंड, अमेरिका या परदेशातील विद्यापीठासह आपल्या सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, शिवाजी विद्यापीठ अशा अनेक विद्यापीठांबरोबर सामंज्यस करार केला आहे. मेडीकल युनिव्हर्सिटीने विविध प्रकल्प हाती घेतले असून कृषी विद्यापीठ या नवीन प्रकल्पाची भर पडली आहे.

### मेडीकल कॉलेजसाठी २१ मजली इमारत

मेडीकल विद्यापीठातील विद्यार्थ्यांना अत्याधुनिक सुविधा एकाच इमारतीत देण्यासाठी २१ मजली मेडीकल कॉलेजची इमारत उभारण्याचा मानस आहे. येत्या तीन महिन्यात इमारतीची पायाभरणी केली जाईल, तर तीन वर्षात इमारतीचे संपूर्ण बांधकाम पूर्ण केले जाणार आहे, असेही कुलपती डॉ. पाटील यांनी सांगितले.

यावेळी डॉ. डी. वाय. पाटील विद्यापीठाचे विश्वस्त पृथ्वीराज पाटील, कुलगुरू डॉ. राकेशकुमार मुदगल, प्र-कुलगुरू डॉ. शिंपा शर्मा, अधिष्ठाता डॉ. राकेशकुमार शर्मा, कुलसचिव डॉ. विश्वनाथ भोसले, उपकुलसचिव संजय जाधव, आमदार जयंत आसगावकर, शिवाजी विद्यापीठ व्यवस्थापन परिषदेचे सदस्य ॲड.धैर्यशील पाटील, डॉ. डी. जी. कणसे, प्रताप उर्फ भैया माने, अमित कुलकर्णी, डॉ. प्रताप पाटील, डी. वाय. पाटील कॉलेजेचा सर्व स्टाफ आदी उपस्थित होते.

### उत्कृष्ट कार्याचा गौरव

सेंटर फॉर इंटरडिसिप्लिनरीचे प्रा. डॉ. उमाकांत पाटील यांना डी. वाय. पाटील बेस्ट रिसर्चर ॲवॉर्ड, डॉ. सी. डी. लोखंडे यांना विज्ञानाचार्य ॲवॉर्ड, कुलसचिव डॉ. व्ही. व्ही. भोसले यांना आऊटस्टँडिंग ॲडमिनिस्ट्रेटर ॲवॉर्ड, वित्त सल्लागार शाम कोले यांना कार्यरत्न पुरस्कार. चार प्राध्यापकांचा डी. वाय. पाटील बेस्ट टीचर पुरस्कार व सौ. शांतादेवी डी. पाटील बेस्ट एम्प्लॉई पुरस्काराने नऊ जणांचा सन्मान करण्यात आला.